''उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचा एक भौगोलिक अभ्यास.''

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी. पदवीसाठी

सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा.

— संशोधक —

रंगवाळ प्रियंका सुग्रीव

एम.ए., बी.एड. सेट

— मार्गदर्शक —

डॉ.एम.पी. मानकरी

एम.ए.,पीएच.डी.

भूगोल विभागप्रमुख

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

ता.उदगीर जि.लातूर

— संशोधन केंद्र —

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

ता.उदगीर जि.लातूर

''उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचा एक भौगोलिक अभ्यास.''

प्रस्तावना :

कृषी हा प्राचीन काळापासुन भारतातील लोकांचा पारंपारीक व प्रमुख्य व्यवसाय आहे. भारत देशाला निसर्गाचे अनन्य साधारण वरदान लाभले आहे. येथील जैवविविधता, ऋतुचक्र, मृदा, पर्यावरण व देशातील विविध संस्कृतीतील लोकांची जीवनपध्दती शेतीला अनुकुल अशी आहे. त्यामुळे प्राचीन काळापासुन या देशात कृषी संस्कृती रुजली व विकसीत झाली. भारतात जवळपास ७० टक्के लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. म्हणुन भारत हा कृषीप्रधान देश म्हणुन ओळखला जातो, परिणामी शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

सद्यस्थितीत लोकसंख्येचे प्रमाण अधिक त्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजा भागविणे हे कृषी क्षेत्राचे महत्वाचे योगदान आहे. पण त्याचबरोबर हे पाहणे ही आवश्यक आहे की शेतीची धारणक्षमता किती आहे. कारण त्यावर शेतीचा विकास अवलंबुन असतो. धारणक्षेत्राचा आकार कमी होत असुन त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी झाली आहे. तसेच साधनसामुग्रीचा अभाव, पावसाची अनिश्चितता, हवामान बदल अशा अनेक समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. तसेच भारतीय शेती क्षेत्राची एक समस्या म्हणजे शेतीचे तुकडीकरण होत असुन त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. अल्पभुधारक शेतकऱ्यांची संख्या एकुण भूधारकांच्या तुलनेत अधिक आहे. त्याचे कारण गरीबी असल्यामुळे अशा शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात आर्थिक समस्यांचा सामाना करावा लागतो. तसेच काही नैसर्गिक आपत्ती जसे दुष्काळ, पावसाची अनिश्चितता, हवामानातील बदल, पूर अशा आपत्तीमुळे शेतीत मोठया प्रमाणात नुकसान होते शेतकऱ्याची हालाकिची आर्थिक परिस्थिती व बहुतांश शेतकरी निरक्षर असल्यामुळे शासनाच्या शेतीविषयक योजनापासुन ते वंचित राहतात. परिणामी शेती परंपागत पध्दतीने करतात.

शेतकऱ्यांचे वर्गीकरण :

शेतकऱ्यांच्या धारणक्षेत्रानुसार वर्गीकरण करताना मोठे भूधारक, मध्यम भूधारक, अल्पभूधारक, सिमांत / लहान भूधारक असे गट पाडले जातात.

एक हेक्टरपर्यंत क्षेत्र असणारे शेतकरी सिमांत शेतकरी, एक ते दोन हेक्टरपर्यंत शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना अल्पभूधारक, चार ते दहा हेक्टरपर्यंत शेती असणाऱ्यांना मध्यम

भूधारक आणि दहा हेक्टर पेक्षा जास्त शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा भूधारक शेतकरी म्हणतात.

अल्पभूधारक शेतकरी व्याख्या :

१. महाराष्ट्र कर्ज निवारण कायदा १९७५ कलम २ (म) नुसार

''जो शेतकरी एका हेक्टरपेक्षा जास्त परंतु दोन हेक्टरपेक्षा कमी असलेली जमीन व्यक्तिशः कसतो तसेच वरील मर्यादेपर्यंत असलेली जमीन कसणारे कुळ किंवा बटाईदार हे अल्पभूधारक शेतकरी या व्याख्येत येतात.''

२. मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम (१९४८) :

''मुख्यत्वे शेती किंवा शेतमजुरी यावर उपजीविका करणारा व निर्वाहक क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या जमिनीवर शेती करणारा तो अल्पभूधारक.''

३. ''दोन हेक्टर पेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यास अल्पभूधारक म्हणतात.''

४. ''अकार्यक्षम धारण क्षेत्रात शेती कसणारा शेतकरी म्हणजे अल्पभूधारक होय.''

५. ''अल्पभूधारक म्हणजे जमिनीची धारण क्षमता कमी असलेला शेतकरी होय.''

विषयाची निवड :

प्राचीन काळापासुन शेतीला अधिक महत्व असून शेतकरी आपली उपजिवीका शेतीवर भागवित आला आहे. वाढती लोकसंख्या व वारसाहक्क कायद्यामुळे शेतजमीनीचे मोठया प्रमाणात तुकडीकरण होऊन अल्पभूधारक शेतकऱ्यात वाढ होत आहे. त्यातच उदगीर भागातील शेती ही निसर्गाच्या पावसावर अवलंबुन आहे. पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे शेतीचे उत्पन्न दिवसेंनदिवस घटत चालले आहे. अल्पभूधारक शेतकरी कमी धारणक्षेत्रामुळे नवीन तंत्रज्ञान, बी–बीयाने, अवजारे, किटकनाशके जलसिंचन या आदानाचा वापर करु शकत नाही. त्यामुळे उत्पन्न कमी असल्यामुळे आर्थिक स्थिती कमकुवत होते किंवा काही वेळेस शेतकरी कर्ज घेतो, कर्ज फेडता न आल्यामुळे अशा शेतकऱ्याची आत्महत्या वाढत चाललेली आहे.

आशा उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी तसेच त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती व त्यावर परिणाम करणारे भौगोलिक घटक यांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते म्हणुन प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने ''उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचा एक भौगोलिक अभ्यास.'' हा विषय निवडला आहे.

अभ्यासक्षेत्राचा नकाशा



अभ्यासक्षेत्र :

उदगीर तालुका हा लातूर जिल्हयाचा भाग असुन तालुक्यास एक ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. उदगीर तालुका लातुरच्या आग्नेयेस कर्नाटक राज्याच्या सीमावर्ती भागात वसलेला आहे. उदगीर तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°१६′ उत्तर ते १८°३७′ उत्तर अक्षवृत्त दरम्यान तर रेखावृत्तीय विस्तार ७६°५६′ पूर्व ते ७७°२१′ पूर्व रेखावृत्त दरम्यान आहे. तालुक्याचे क्षेत्रफळ ७७९.२२ चौरस किलोमीटर असून ते लातुर जिल्हयाच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत १०.८८ टक्के आहे. २०११ च्या जनगणनेनुसार उदगीर तालुक्याची लोकसंख्या ३११०६६ एवढी होती.

संशोधनाची उद्दिष्टये :

१. उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.
२. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या धारणक्षेत्राचा अभ्यास करणे.
४. अल्पभूधारक शेतकऱ्यांवर भौगोलिक घटकाच्या प्रभावाचा अभ्यास करणे.
५. अल्पभूधारक शेतकरी यांच्या पीकरचनेचा अभ्यास करणे.
६. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
७. अल्पभूधारक शेतकरी निर्माण होणाऱ्या कारणांचा अभ्यास करणे.
८. अल्पभूधारक शेतकरी यांना लाभ मिळालेल्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :

१. उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होताना दिसत नाही.
२. उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती हालाकिची दिसुन येते.
३. उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या संख्येत वाढत झालेली दिसुन येते.

तथ्य संकलनाच्या पध्दती :

उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचा भौगोलिक अभ्यास करण्यासाठी माहिती व सांख्यिकीय आकडेवारी संकलनासाठी पुढील साधन सामग्रीचा अवलंब केला जाणार आहे.

१. प्राथमिक स्त्रोत :

संशोधन विषयाच्या अभ्यासाकरिता तथ्य संकलनासाठी मुलाखत या तंत्राचा वापर करुन उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांकडुन माहिती मिळवली जाईल. प्रत्यक्ष संशोधन क्षेत्रात जाऊन निरीक्षण तसेच प्रत्यक्ष संवादाव्दारे माहिती प्राप्त करण्यात येईल. प्रश्नावलीच्या साहयाने माहिती प्राप्त केली जाईल.

२. दुय्यम स्त्रोत :

दुय्यम स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी उदगीर जनगणना अहवाल, कृषी गणणा, कार्यालयीन अहवाल, सामाजिक व आर्थिक समालोचन, दैनिके, मासिके, वर्तमान पत्र, लेख, प्रबंध, प्रकाशित, अप्रकाशित कागदपत्रे, इंटनेट इ. यांचा संशोधन अभ्यासासाठी वापर केला जाईल.

आकडेवारीचे विश्लेषण :

प्रस्तुत अभ्यासविषयाच्या संशोधनातील आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय व गणितीय साधनांचा वापर करण्यात येईल. सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी आलेख, तक्ते, सारणी, नकाशे यांचा उपयोग करण्यात येईल.

प्रकरण रचना :

१. प्रकरण पहिले : प्रास्ताविक

पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना कृषी व कृषी भूगोलाची ओळख, कृषीचा उगम व विकास, अभ्यास क्षेत्राची निवड, अभ्यासाची उद्दिष्टे, गृहितके व तथ्य संकलन पध्दती, संशोधन आराखडा.

२. प्रकरण दुसरे : उदगीर तालुक्याची प्राकृतीक व सांस्कृकतिक रचना

प्रस्तुत प्रकरणात उदगीर हे अभ्यासक्षेत्र असल्यामुळे उदगीर तालुक्याची ओळख, स्थान व विस्तार, ऐतिहासिक पार्श्वभूमी, भूपृष्ठरचना, हवामान, पर्जन्य, नदीप्रणाली, तापमान, मृदा, भूमीउपयोजन, लोकसंख्या, साक्षरता, लिंगप्रमाण, वाहतुक व दळणवळण इ. समावेश आहे.

३. प्रकरण तिसरे : शेतीचे प्रकार व शेतकऱ्यांचे वर्गीकरण

या प्रकरणात शेतीचे प्रकार, पीके, मातीचे प्रकार, शेतकऱ्यांचे त्यांच्या धारणक्षेत्रानुसार वर्गीकरण.

४. प्रकरण चौथे : उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकरी

या प्रकरणात केंद्र शासनाची अल्पभूधारकांची संकल्पना, महाराष्ट्र शासनाची अल्पभूधारकांची संकल्पना, उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या, भारत, महाराष्ट्र, लातूर व उदगीर यांचा तुलनात्मक अभ्यास.

५. प्रकरण पाचवे : उदगीर तालुक्यातील अल्पभूधारकांची सामाजिक व आर्थिक स्थिती

या प्रकरणात अल्पभूधारक शेतकऱ्यांची कौटुंबिक स्थिती, राहणीमान, शैक्षणिक स्थिती, पीक प्रारुप, उत्पादन, शेती जोडव्यवसाय, कर्ज स्वरुप इ. समावेश आहे.

६. प्रकरण सहावे : अल्पभूधारक शेतकऱ्यांवर परिणाम करणारे

भौगोलिक, सामाजिक व आर्थिक घटक

उदगीर तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांवर पर्जन्य, तापमान, मृदा, प्राकृतिक रचना, रुढी परंपरा, अंधश्रध्दा, शासकीय धोरण, भांडवल, शिक्षण इ. घटक परिणाम करतात याचा अभ्यास.

७. प्रकरण सातवे : अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या व शासकीय योजनांचा अभ्यास

या प्रकरणात अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास व विविध अल्पभूधारकांसाठीच्या शासकीय योजना व योजनांच्या लाभार्थी यांचा अभ्यास.

८. प्रकरण सहावे : निष्कर्ष व संदर्भ सूची

संदर्भ ग्रंथ :

१. आगलावे प्र. (२००८) : संशोधन पध्दती व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

२. कोळंबे र. (२०१९) : भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे

३. गायके ह.प्र. (२०२३) : कृषिशास्त्र, ऑर्किड प्रकाशान, लातूर

४. घारपुरे व. (२०१३) : आर्थिक भूगोल, पिंपळापुरे ॲण्ड कं. प्रकाशन, नागपूर.

५. दामावले डी.एन. (२०२०) : महात्मा फुले आणि अल्पभुधारक शेतकरी विशेष संदर्भ लातूर जिल्हा, अजिंक्य प्रकाशन, वाशिम.

६. दत्त एवं सुंदरम, दत्त ग ॲण्ड महाजन अ. (२०१६) : भारतीय अर्थव्यवस्था, एस. चन्द प्रकाशन, नवी दिल्ली

७. नागरगोजे ए.यु. (२०१३) : उदगीर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड

८. फुले स (२०१२) : कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातूर

९. लातूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०२२)

१०. agcensus.dacnet.nic.in

११. Census of India २०११, Tahsil Profile : District Latur : Tahsil Udgir

१२. mrsac.gov.in

संशोधक

रंगवाळ प्रियंका सुग्रीव

(एम.ए.,बी.एड.सेट)

मार्गदर्शक

डॉ. एम.पी. मानकरी

(एम.ए., पीएच.डी.)

भूगोल विभागप्रमुख

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

ता.उदगीर जि. लातूर